MHJN050007082025

## आदेश नि.क्र. १४ वर

१. प्रतिवादी क्र. १ व २ यांनी अर्ज सादर केला की, प्रतिवादी क्र. १ व २ यांना लेखी जबाब दाखल करणे कामी विलंब झालेला आहे. सदरचा विलंब माफ करण्यात येवुन व दि. ०१.११.२०२५ रोजी त्यांच्या विरुद्ध झालेला 'विना लेखी जबाब चालविण्याचा' आदेश रद्द करुन त्यांचा लेखीजबाब पटलावर घेण्यात यावा.

२. प्रतिवादी क्र. १ व २ यांचे म्हणणे की, प्रतिवादी क्र. १ व २ हे वयोवृध्द असल्यामुळे व प्रतिवादी क्र. २ यांचे वय जवळपास ९० वर्षाच्या वरती आहे. त्यांची तब्बेत बरोबर नसल्यामुळे प्रतिवादी क्र. १ व २ त्यांचा जबाब मुदतीत दाखल करु शकले नाही. प्रतिवादी क्र. १ व २ यांनी लेखी जबाब दाखल करण्यास जाणुन बुजून उशीर केलेला नाही ते वयोवृध्द असल्यामुळे त्यांना त्यांचा लेखी जबाब मुदतीत दाखल करता आला नाही. प्रतिवादी क्र. १ व २ यांच्या विरुद्ध झालेला 'विना लेखी जबाब चालविण्याचा' आदेश रद्द करुन मिळाला नाही व त्यांना लेखी जबाब दाखल करणे कामी झालेला विलंब माफ केला नाही तर त्यांचे कधीही न भरुन येणारे नुकसान होईल.

३. वादीने त्यांचा खुलासा निशानी क्र. १४ वर दाखल केला. वादीचे म्हणणे की, अर्जातील कारण संयूक्तीक नाही. प्रतिवादींनी अर्जात कोणतेही ठोस कारण नमुद केलेले नाही. प्रतिवादी क्र. १ व २ यांनी जाणून बूजून विलंब केलेला आहे. त्यामुळे त्यांचा अर्ज नामंजूर करावा.

४. प्रतिवादी क्र. १ व २, यांनी सदरचा विलंबमाफीचा व 'विना लेखी जबाब चालविण्याचा' आदेश रद्द करुन मिळणेकामी अर्ज दाखल केला आहे. त्यांना लेखी जबाब दाखल करणेकामी झालेला ६५ दिवसांचा विलंब माफ करुन लेखी जबाब पटलावर घ्यावा म्हणून त्यांनी सदरचा अर्ज दाखल केला आहे. सबब, वरील सर्व परिस्थिती विचारात घेता प्रतिवादी क्र. १ व २ ने अर्जात नमूद केलेले कारण प्रथमदर्शनी संयुक्तीक वाटत नाही. परंतु, जर प्रतिवादी क्र. १ व २ यांचा खुलासा अभिलेखावर आला नाही तर त्यांना त्यांची बाजू मांडता येणार नाही. तसेच प्रकरण गुणवत्तेवर चालण्यास अडचण निर्माण होईल. नैसर्गीक न्यायतत्वानुसार प्रतिवादी क्र. १ व २ यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देणे आवश्यक आहे. अर्ज जर नामंजूर केला तर प्रकरणात पुन्हा गुंतागुंत वाढून वेळ वाया जाईल व प्रकरण पुन्हा प्रलंबीत पडेल. तसेच प्रतिवादी क्र. १ व २ याला प्रकरणात हजर होण्यास व त्याचा खुलासा दाखल करण्यासाठी बराच कालावधी लागलेला आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र. १ व २

ने केलेला  विलंब लक्षात घेता त्याचा अर्ज कॉस्ट लावून मंजूर करणे न्यायोचीत होईल. करिता खालीलप्रमाणे आदेश,

आदेश

-

१. अर्ज निशाणी १४ खालील अटीस अधीन राहून  मंजुर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र. १ व २ यांनी रुपये ७००/- ची कॉस्ट न्यायालयात जमा केल्यानंतर प्रतिवादी क्र. १ व २ यांचा खुलासा अभिलेखावर घेण्यात यावा.

APARNA BALASAHEB RAUT

Digitally signed by APARNA BALASAHEB RAUT
Date: 2026.04.20 17:27:09 +0530

दिनांक २०/०४/२०२६ ( अपर्णा बा. राऊत )

सह दिवाणी न्यायाधीश  क. स्तर, परतूर

**MHJN050007082025**

## आदेश नि.क्र. १२ वर

१. प्रतिवादी क्र. ३ व ४ यांनी अर्ज सादर केला की, प्रतिवादी क्र. ३ व ४ यांना लेखी जबाब दाखल करणे कामी विलंब झालेला आहे. सदरचा विलंब माफ करण्यात येवुन त्यांचा लेखीजबाब पटलावर घेण्यात यावा.

२. प्रतिवादी क्र. ३ व ४ यांचे म्हणणे की, प्रतिवादी क्र. ३ व ४ हे ऊसतोडणीसाठी कर्नाटक येथे गेलेले असल्यामुळे ते न्यायालयात हजर राहू शकले नाही व त्यांच्या वकीलांना माहिती देऊ शकले नाही. त्यामुळे प्रतिवादी क्र. ३ व ४ त्यांचा जबाब मुदतीत दाखल करु शकले नाही. प्रतिवादी क्र. ३ व ४ यांनी लेखी जबाब दाखल करण्यास जाणुन बुजून उशीर केलेला नाही ते ऊसतोडीस गेले असल्यामुळे त्यांना त्यांचा लेखी जबाब मुदतीत दाखल करता आला नाही. प्रतिवादी क्र. ३ व ४ यांना लेखी जबाब दाखल करणे कामी झालेला विलंब माफ केला नाही तर त्यांचे कधीही न भरुन येणारे नुकसान होईल.

३. वादीने त्यांचा खुलासा निशानी क्र. १२ वर दाखल केला. वादीचे म्हणणे की, अर्जातील कारण संयूक्तीक नाही. प्रतिवादींनी अर्जात कोणतेही ठोस कारण नमुद केलेले नाही. प्रतिवादी क्र. ३ व ४ यांनी जाणून बूजून विलंब केलेला आहे. त्यामुळे त्यांचा अर्ज नामंजूर करावा, अन्यथा जास्तीत जास्त कॉस्ट करुन मंजूर करावा.

४. प्रतिवादी क्र. ३ व ४, यांनी सदरचा विलंबमाफीचा अर्ज दाखल केला आहे. त्यांना लेखी जबाब दाखल करणेकामी झालेला २७ दिवसांचा विलंब माफ करुन लेखी जबाब पटलावर घ्यावा म्हणून त्यांनी सदरचा अर्ज दाखल केला आहे. सबब, वरील सर्व परिस्थिती विचारात घेता प्रतिवादी क्र. ३ व ४ ने अर्जात नमूद केलेले कारण प्रथमदर्शनी संयुक्तीक वाटत नाही. परंतु, जर प्रतिवादी क्र. ३ व ४ यांचा खुलासा अभिलेखावर आला नाही तर त्यांना त्यांची बाजू मांडता येणार नाही. तसेच प्रकरण गुणवत्तेवर चालण्यास अडचण निर्माण होईल. नैसर्गीक न्यायतत्वानुसार प्रतिवादी क्र. ३ व ४ यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देणे आवश्यक आहे. अर्ज जर नामंजूर केला तर प्रकरणात पुन्हा गुंतागुंत वाढून वेळ वाया जाईल व प्रकरण पुन्हा प्रलंबीत पडेल. तसेच प्रतिवादी क्र. ३ व ४ याला प्रकरणात हजर होण्यास व त्याचा खुलासा दाखल करण्यासाठी बराच कालावधी लागलेला आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र. ३ व ४ ने केलेला विलंब लक्षात घेता त्याचा अर्ज कॉस्ट लावून मंजूर करणे न्यायोचीत होईल. करिता खालीलप्रमाणे आदेश,

नियमीत दिवाणी दावा क्र. ३८/२०२५
विजयमाला वि. ज्ञानोबा

आदेश

१. अर्ज निशाणी १२ खालील अटीस अधीन राहून मंजुर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र. ३ व ४ यांनी एकूण रुपये ५००/- ची कॉस्ट न्यायालयात जमा केल्यानंतर प्रतिवादी क्र. ३ व ४ यांचा खुलासा अभिलेखावर घेण्यात यावा.

दिनांक २०/०४/२०२६

( अपर्णा बा. राऊत )
सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, परतूर